# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५

**दूरध्वनी:** ०२२-२२१६३९६४/२२१६३९६५ / २२१६३९६९ **ई-मेल:** mercindia@merc.gov.in

**संकेत स्थळ:** www.merc.gov.in


**जाहिरात क्र. 16/2022-23**

## जाहिर सूचना

### महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (पहिली सुधारणा) विनियम, २०२२ च्या मसुद्यावर महाराष्ट्र राज्यातील जनतेकडून सूचना आणि हरकती मागविण्याबाबत

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (आयोग), स्पर्धात्मक वीज दरावर आधारीत बोलीद्वारे विकसित करावयाच्या राज्यांतर्गत पारेषण प्रकल्पासाठी थ्रेशोल्ड मर्यादा आणि अन्य अटी विनिर्दिष्ट करुन मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) (पहिली सुधारणा) विनियम, २०२२ तयार केले आहेत.

२. विनियमांमधील प्रस्तावित सुधारणेचे प्रारुप, स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह, आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

३. आयोग, याद्वारे उपरोक्त प्रारुपावर अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकती मागवित आहे. इच्छुक हितसंबंधितांनी त्यांच्या सूचना आणि हरकती २ (१+१) प्रतींमध्ये, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०००५, या पत्त्यावर व्यक्तिश: किंवा पोस्टाने, किंवा ई-मेल: **mytregulations2019@merc.gov.in** द्वारा पाठवाव्यात.

४. १९ सप्टेंबर, २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती प्रारुप विनियमांस अंतिम स्वरुप देण्यापूर्वी विचारात घेण्यात येतील. या विषयावरील सर्व पुढील पत्रव्यवहार जसे की, मुदतवाढ इ.फक्त आयोगाच्या संकेत-स्थळाच्या **(www.merc.gov.in)** माध्यमातून करण्यात येईल.

**ठिकाण: मुंबई**
**दिनांक: १९ ऑगस्ट २०२२**

**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**